# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक ३१/०८/२०२४ (शनिवार) सायंकाळ

---

### घरफोडीच्या गुन्हयातील फरार आरोपी गजाआड

दिनांक ३०/०८/२०२४ रोजी पोस्टे खापरखेडा येथील स्टाफ पोस्टे परिसरात पाहिजे असलेल्या आरोपीचा शोध घेत असतांना गोपनीय बातमीदारांकडुन माहिती मिळाली की, पोस्टे खापरखेडा येथील अप क्र. २१८/२१ कलम ४५७, ३८० भादंवि मधील पाहिजे असलेला **आरोपी नामे– श्रवणकुमार उर्फ पवण शिवराम यादव वय २३ वर्ष रा. कवडस पाटणसावंगी** हा दहेगाव बस स्टॉपवरून पाटणसांवगी येथुन नागपूरला जात असल्याची गोपनीय माहिती मिळाल्याने पोस्टे खापरखेडा डी बी पथकाने सापळा रचुन आरोपीस ताब्यात घेतले. सदर आरोपीस विश्वासात घेवुन विचारपुस केली असता सदर आरोपीने गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यावरून सदर गुन्हयात आरोपीचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे खापरखेडा येथील ठाणेदार पोनि अरविंदकुमार कतलाम, पोउपनि आरती नरोटे, पोहवा प्रफुल राठोड, शैलेश यादव, मुकेश वाघाडे, राजू भोयर, राजकुमार सातुर, कविता गोंडाणे यांचे पथकाने केली.

### गंभीर दुखापत करणाऱ्या आरोपीस अटक

दिनांक २९/०८/२०२४ रोजी फिर्यादी नामे– निलेष शिवकुमार खंडेलवाल वय ३६ वर्ष रा. वार्ड कं. १७ खंडेलवाल ले आउट नरखेड हे आपले घरी मोबाईल पाहत असता घराचे बाहेर **आरोपी नामे– लखन नाहारकर, रा नरखेड** याने आवाज दिला असता फिर्यादी बाहेर आला. आरोपी याने जुन्या वादाचे कारणावरून आरोपी याने फिर्यादीस शिवीगाळ करुन फिर्यादीचे गालावर थापड मारुन कोणत्यातरी धारधार वस्तुने पाठीवर मारुन जखमी केली व पाहुन घेण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे नरखेड येथे आरोपीविरूद्ध कलम ११८(२), ३५१(२), ३५२ बि. एन.एस अन्वये गुन्हा नोंद असुन सदर आरोपीस नरखेड पोलीसांनी अटक केली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा अरून भेंडे हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे नरखेड ठाणेदार सपोनि अजित कदम, पोहवा अरूण भेंडे, पोअं केवल आडे, हरीनारायण चव्हान यांनी पार पाडली.

# पोस्टे कन्हान अंतर्गत कोळसा चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

दिनांक ३०/०८/२०२४ रोजी पोस्टे कन्हान येथील स्टाफ पोस्टे परीसरात पेट्रोलींग करीत असता गोपनीय माहिती प्राप्त झाली की, पोस्टे कन्हान अंतर्गत मौजा निलज खंडाळा येथील तारसा रोडवरील एका कोळसा खरेदी विक्री टालवर अवैधरीत्या चोरी करून आणलेला कोळसा एकुन सहा मोटारसायकलवर अवैद्यरित्या कोळसा आणुन विक्री करीत आहे. अशा माहिती वरून स्टाफ यांनी घटनास्थळी पोहचुन सहा ईसम १) स्प्लेंडर हिरो होंडा मो.सा. क्रं. एम एच– ४०/एक्स– १३६२ चा चालक आरोपी नामे–आयुष श्रावन शेंदुरकर याने आपल्या मोसावर तिन बोरी कोळसा रु. ३००००/– २) मो. सा. क्र. स्प्लेंडर हिरो होंडा एम एच –४०/बी व्ही– २१०९ चा चालक आरोपी नामे– समिर राजकुमार गोलाईत याने आपल्या ताब्यातील वाहनात ४ बोरी कोळसा रु.४००००/–, ३) मो. सा. क्रं स्प्लेंडर हिरो होंडा एम एच–३१/ए एक्स– १२२८ चा चालक आरोपी नामे– शुभम गोपाल चकोले याने आपल्या वाहनात तिन बोरी कोळसा रु. २००००/– ४) स्प्लेंडर हिरो होंडा मो.सा. क्र. एम एच–४०/ए व्ही –४७०५ चालक आरोपी नामे–अक्षय जयराम कोरवते याने आपल्या वाहनात ४ बोरी कोळसा रु. २००००/– ५) हिरो होन्डा पॅशन प्रो मो. सा. क्र. एम एच– ४०/ झेड ३९९६ चा चालक आरोपी नामे– देशराज निरुत्तम जैस्वाल याने आपल्या मोसावर ३ बोरी कोळसा रू.२००००/– ६) स्प्लेंडर हिरो होंडा एमएच ४० एवाय ४५६१ चा चालक आरोपी नामे–शुभम राजु सोनटक्के याने आपल्या वाहनामध्ये ४ बोरी कोळसा रू.२०००० ७) पवन बाळकृष्ण सेलोटे काटा करणारा ८) अनिकेत ज्ञानेश्वर उपासे हे घटनास्थळवर चोरी करताना मिळुन आले. आरोपीतांकडुन चोरीचा खरेदी केलेला कोळसा १० टन अ. कि. ५०००/– रू. व एक ईलेक्ट्रीक काटा व ६ मोटरसायक किमती १५०,०००/–रू. असा एकुण २०५०००/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर आरोपीतांना सुचनापत्रावर सोडण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे कन्हान येथील ठाणेदार पोनि राजेंद्र पाटील, सपोनि राहुल चव्हान, पोहवा हरीष सोनभद्रे, पोना अनिल यादव, पोअं अमोल नागरे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर